# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **छत्रपती शिवाजी महाराजांची 394 वी जयंती मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली**

दिनांक 19 फेब्रुवारी 2024 रोजी मिरा भाईंदर शहरात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम सकाळी 9.00 वाजता काशीमिरा येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ स्मारकाला मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या हस्ते पुष्पहार घालून मानवंदना देण्यात आली. त्यांनतर सकाळी 9.30 वाजता भाईंदर पश्चिम फाटक येथील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून त्यांना वंदन करण्यात आले.

तद नंतर महानगरपालिका मुख्य कार्यालयाचे समोरील प्रांगणात सकाळी 9.45 वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांचे व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. तसेच सकाळी 10.00 वाजता महानगरपालिका मुख्य कार्यालय दुसरा मजला येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) व अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करून छत्रपती शिवाजी महाराजांची 394वी जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. महाराजांच्या जयंतीनिमित्त महापालिका कर्मचाऱ्यांनी महाराष्ट्र राज्याचे राज्यगीत व महानगरपालिका शाळा क्रमांक 4च्या विद्यार्थ्यांनी शिवनेरीवरील महाराजांचा जन्म, महाराष्ट्र राज्याने केलेल्या प्रगतीबाबत सांस्कृतिक कार्यक्रम व पोवाडा आयोजित केला. महापालिका सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांना तसेच विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त मा. आयुक्त यांनी शुभेच्छा दिल्या.